Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November-2018 Special Issue – LXXIII

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mr. Bharati Sonawane - Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)
Dr. Munaf Shaikh, Jalgaon (Urdu)

S.P.Mahavidyalaya,Bhoom
Bhoom

Visit to - www.researchjourney.net SWATIDHAN PUBLICATION

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November-2018 Special Issue - LXXIII

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 500/-

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom

| | | |
|---|---|---|
| 27 | Role of Lonely Mothers in the Works of Jhumpalahiri **Asst. Prof. Sanober Kahkeshan** | 145 |
| 28 | Institutional Repositories Across the World: A Case Study of Open DOAR (JISC) **Mr. Nikhil Patil & Dr. Chandrashekhar Wani** | 151 |
| 29 | Spatial Distribution and Growth of Tribal Population in Chopda, Yawal and Raver Tehsils **Kishor Nehete** | 158 |
| | **हिंदी विभाग** | |
| 30 | श्रीमद्भगवद्गीता की अद्वैतपरक भाष्य- एक शोधपरक दृष्टी **निशा** | 164 |
| 31 | 'अक्षयवट': वर्तमान महानगरो का सच **डॉ.सन्मुख मुच्छटे** | 170 |
| 32 | मोहन राकेश के साहित्य में मनोविज्ञान : एक अध्ययन **प्रा. सूर्यकांत आमलपुरे** | 173 |
| 33 | हिंदी सिनेमा और हाशिए का समाज **डॉ.राजश्री तावरे** | 176 |
| 34 | समान शीर्षकवाली कृतियो का परिचय **सचिन कुमावत** | 179 |
| 35 | जनसंचार के माध्यमो में प्रयुक्त हिंदी **डॉ. भीमराव मानकरे** | 183 |
| 36 | रघुवीर सहाय का गद्य साहित्य **डॉ. प्रमोद पडवळ** | 186 |
| 37 | हिंदी व्यंग्य परंपरा में शंकर पुणतांबेकर का योगदान **डॉ. बळीराम राख** | 192 |
| 38 | भूमंडलीकरण युग में अनुवाद की आवश्यकता **प्रा. विवेकानंद चव्हाण** | 195 |
| 39 | मध्यप्रदेश में औद्योगिक निवेश की संभावनाएँ – एक अध्ययन **प्रो. डॉ. सुहास धांडे** | 199 |
| 40 | उत्तर छायावाद के उपेक्षित कवि श्री रामगोपाल शर्मा 'रुद्र' की काव्य रचना के विविध आयाम : एक अध्ययन **डॉ. विजयप्रकाश शर्मा** | 206 |
| 41 | भारतीय भाषा परिवार और हिंदी **डॉ.अर्जुन पवार** | 213 |
| 42 | आदिवासी संस्कृती **डॉ. प्रवीण कांबळे** | 218 |
| 43 | भारत के अन्य भाषओ में लिपि देवनागरी की आवश्यकता **डॉ. विलास कांबळे** | 220 |
| 44 | बाजारवाद और हिंदी **डॉ.संगीता जगताप** | 225 |
| 45 | रघुवीर सहाय की कविता में लोकतंत्र **अक्षय भोसले** | 228 |
| 46 | नागार्जुन की कविता 'प्रेत का बयान': भाषिक संरचना **डॉ. गीता दोड़मणी** | 232 |
| 47 | 'उधर के लोग' दलित उपन्यास में स्त्री सशक्तीकरण **डॉ. सुचिता गायकवाड** | 238 |
| 48 | डॉ. गिरीराज शरण अग्रवाल कि गजलों में सामाजिक चिंतन **डॉ. अमोल दंडवते** | 244 |
| 49 | अंतरराष्ट्रीय दार्शनिक, भारतीय साहित्यिक एवं समर्पित समाजसेवी श्रीमान प्रताप सेठजी **डॉ. शशिकांत सोनवणे** | 249 |
| 50 | महिला रचानाकारों कि कहानियों में जीवन मूल्य **डॉ. संतोष आडे** | 257 |
| 51 | लोकगीत और बंजारा समाज **डॉ.एम. के.राऊत** | 264 |
| | **मराठी विभाग** | |
| 52 | संजय पवार यांच्या एकांकिका :एक दृष्टीक्षेप **डॉ. माणिक बागले** | 266 |
| 53 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वराज्य **आबासाहेब कसबे** | 272 |
| 54 | मराठवाड्यातील वेरूळचे शिल्प-कैलास मंदिर **प्रा. डॉ. किशोरकुमार गव्हाणे** | 277 |


S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

# मराठवाड्यातीलवेरूळचे शिल्प–कैलास मंदिर

प्रा. डॉ. किशोरकुमार गव्हाणे
(असो. प्रोफेसर) एस.पी. कॉलेज, भूम.

भारताला प्राचीन इतिहासाची उज्वल परंपरा आहे. प्राचीन इतिहास व संस्कृतीचा फार मोठा ऐतिहासीक वारसा आपल्या भारत देशाला लाभलेला आहे. प्राचीन भारतातील सर्वात सुसंस्कृत, प्रगत, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा प्रारंभ सिंधू संस्कृतीपासून होतो. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतर पुढे आलेली वैदिक संस्कृती ही प्राचीन भारताच्या इतिहासातील एक प्रगत व सुसंस्कृत संस्कृती म्हणून ओळखली जाते. यानंतर साम्राज्यवादाचा उदय होवून कांही महत्वाच्या घराण्यांनी भारताच्या राजकीय पटलावर दीर्घकाळ सत्ता स्थापन केली. यापैकी काही घराण्यांनी उत्तर भारतात तर काही घराण्यांनी दक्षिण भारतात आपले साम्राज्य निर्माण केले. विशेषत: सातवाहन, वाकाटक व चालुक्य या घराण्यांनी दक्षिण भारताच्या इतिहासात शेकडो वर्षे राज्य केले. चालुक्य घराण्यानंतर राष्ट्रकूट घराण्याने राज्य केले. जवळजवळ सव्वादोनशे वर्षे राष्ट्रकूट या राजघराण्याने राज्यकारभार केला. राष्ट्रकूटाचे दक्षिण भारताच्या सांस्कृतिक क्षेत्रात फार मोठे योगदान आहे. त्यांच्याच काळात सद्याच्या मराठवाड्यातील वेरूळ परिसरात जगप्रसिध्द कैलास लेणीच्या निर्मितीची प्रकिया (मंदिर काम) सुरू झाले.

**वेरूळचे ऐतिहासिक महत्व–**

मराठवाडयातील वेरूळच्या परिसराचे ऐतिहासिक महत्वआहे हे येथे असलेल्या घृष्णेश्वर मंदिराच्या अस्तित्वामुळे आपल्याला मान्य करावे लागते. घृष्णेश्वर येथील शिवमंदिराचे महत्व १२ जोतिर्लिंगापैकी एक म्हणून मान्यता पावलेले असून स्कंद पुराणातील 'शिवलीलामृत' या ग्रंथामध्ये १२ व्या अध्यायात घृष्णेश्वर विषयीची कथा वर्णिलेली आहे. वेरूळ शहराविषयीचा ऐतिहासिक उल्लेख राजा दुसरा कर्क याने काढलेल्या बडोदा ताम्रपटातील लेखात आढळतो. या ताम्रपटातील उल्लेख असलेले हे येळापूर म्हणजेच आजचे 'वेरूळ' हे डॉ. डी.आर. भांडारकर यांनी सिध्द केलेले आहे. त्यांच्या मते काळाच्या ओघात बोली भाषेंच्या विविध उच्चारण पध्दतीमुळे अपभ्रंश होवून येळापूरचे वेरूळ झाले असावे.[१] येळापूर येथील येलाराजा (हाच दुसरा कर्क असावा का?)याने 'एलापूर' गाव वसवले होते. आज जगाच्या नकाशामध्ये याच एलापूरची (एलोरा) ओळख 'वेरूळ' अशी आहे. हे गाव औरंगाबाद चाळीसगाव रस्त्यावर असून, दौलताबाद या ऐतिहासिक शहरापासून केवळ १० कि.मी. अंतरावर आहे. पुरातन सिंधू संस्कृतीचे थोडे फार अवशेष येथे उत्खननात हाती आलेले आहेत. मध्ययुगीन कालखंडातील कांही संतमहंताचे वास्तव्य या परिसराशी निगडीत आहे. अल्लाउद्दीन खिलजी, मालोजीराजे भोसले, अहिल्याबाई होळकर, मलिक अंबर इत्यादींच्या राजकीय इतिहासासीमराठवाडयातील हा परिसर निगडीत आहे. तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाची ओळख वेरूळ परिसरावरून होते.

**राष्ट्रकूट घराणे–**

दक्षिण भारताच्या इतिहासात जे काही प्रतिष्ठित व प्रभावी राजवंश होवून गेलेले आहेत त्यामध्ये राष्ट्रकूट घराण्याचा समावेश करावा लागेल. चालुक्य सम्राट कीर्तिवर्मा दुसरा याचा राष्ट्रकूट वंशातील दंतिदुर्ग या सरंजामदाराने पराभव करून दक्षिण भारतात राष्ट्रकूट वंशाची स्थापना केली. [२] राष्ट्रकूट मूळचे कुठले, ते कोणत्या वंशाचे होते या विषयी संशोधकांत एकमत नाही. राष्ट्रकूट नावाची घराणी महाराष्ट्र, कर्नाटक व राजपुताण्यात आढळतात. राष्ट्रकूट हे मूळचे 'लत्तनूर' (मराठवाड्यातील लातूर) चे रहिवाशी असून हा मूळ कन्नड वंश असल्याचे मत डॉ. आळतेकर यांनी नोंदविले आहे.[३]राष्ट्रकूट म्हणजे सुरूवातीला जनतेकडून वसुल केलेला कर सरकारकडे जमा करणारे अधिकारी असावेत. राष्ट्रकूटाची कांही घराणी चांद्रवंशी तर कांही सूर्यवंशाची आढळतात. 'राष्ट्र म्हणजे प्रांत किंवा विभाग आणि 'कूट' म्हणजे प्रमुख या दोन शब्दापासून 'राष्ट्रकूट' असा शब्दप्रयोग प्रचलित झाला. राष्ट्रकूटाच्या काळातच मराठवाड्यातील कंधार व लातूर हे प्रमुख केंद्र म्हणून नावारूपास आले. डॉ. आळतेकर यांनी हे घराणे कर्नाटकातून निघाले व नंतर विदर्भात स्थायिक झाले असावे असे म्हटले आहे.[४] कर्नाटकातील मान्यखेड (आताचे मलखेड) या गुलबर्गा जवळील गावी त्यांनी राजधानी स्थापन करून २२५ वर्षे या घराण्याने राज्यकारभार करून दक्षिण भारताच्या इतिहासात मोलाचे योगदान दिलेले आहे.

**वेरूळचे कैलास मंदिर–**

राष्ट्रकूट राजांनी मराठवाडयातील वेरूळच्या सांस्कृतिक इतिहासात दिलेले योगदान म्हणजे येथील कैलास मंदिर होय. हे एक पाषाणी मंदिर असून राष्ट्रकूट राजा पहिला कृष्ण याच्या कारकीर्दित घडविण्यास सुरूवात झाली होती.



S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

परंतु हे मंदिर पूर्ण होण्यासाठी किमान १०० वर्षांचा काळ गेला होता असे म्हटले जाते. वेरूळ मंदिराची निर्मिती राष्ट्रकूट काळातच झाली या विषयी बडोदा ताम्रपटात उल्लेख असून या ताम्रपटातील येळापूर म्हणजेच आजचे वेरूळ हे होय. वेरूळचे कैलास मंदिर हा द्रविड वास्तुकलेचा एक उत्कृष्ठ नमुना आहे. राष्ट्रकूट वंशातील राजा पहिला कृष्ण (इ.स.७५७–७८३) याच्या कारकीर्दीत या मंदिराची निर्मिती झाली. हे भव्य मंदिर बांधीव वास्तू नसून डोंगरातील एकच प्रचंड खडक बाहेरून व आतून कोरून त्याची निर्मिती केली आहे. ते डोंगरापासून वेगळे केलेले असून त्याच्याभोवती २७६ फूट लांब व १५४ फूट रूंद असा प्राकार आहे.

वेरूळचे कैलास मंदिर डोंगरात कोरलेले असल्याने ते एखाद्या खड्ड्यात उभे असल्यासारखे वाटते. लांबून पाहणाऱ्याला त्याची भव्यता तितकीशी जाणवत नाही. प्रांगणात प्रवेश करताच मंदिराचे दृश्य पाहून प्रेक्षक थक्क होतात. मंदिराचा खालचा मजला २५ फूट उंचीचा असून मंदिराची मुख्य रचना त्याच्यावर केल्याचे दिसते. मंदिराच्या बाहेरील बाजूवर अनेक शिल्प कोरलेले असून अंतर्भागातही अनेक देवदेवतांच्या मूर्ती कोनाड्यात कोरलेल्या आहेत. चबुतऱ्यावर खोलवर खोदलेल्या हत्तींची व सिंहाची रांग कोरलेली आहे. संपूर्ण मंदिर जणू त्यांच्या पाठीवर तोलून धरले आहे असा भास होतो.[५] या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे मंदिर निर्मितीचे काम शिखरापासून प्रारंभ व पायथ्याला समाप्त अशा पध्दतीने करण्यात आलेले आहे. हे मंदिर म्हणजे भारतीय शिल्पकलेचा अद्वितीय नमुना होय. कैलास मंदिराकडे पाहताच राष्ट्रकूटानी कलेला दिलेल्या भक्कम आश्रयाची तसेच स्थापती, शिल्पी, चित्रकार यांच्या कौशल्याची कल्पना पुरेपूर येवू शकते. हे एक अद्वितीय असे शिवमंदिर असून जागतिक इतिहासात याला तोड नाही.

कैलास मंदिराच्या प्रांगणात प्रवेश करताच गजलक्ष्मी, नद्यांचे मंदिर व त्यापुढे दुमजली नंदीमंडप आहे. नंदीमंडपाच्या दोन्ही बाजूना सुमारे ५० फूट उंचीचे दोन ध्वजस्तंभ आहेत. कैलास मंदिराची उंची तळापासून ९६ फूट आहे. गर्भगृहावर द्राविड पध्दतीचे तीन मजली शिखर आहे. गर्भगृहाच्या पुढे अंतराळ व त्यापुढे सभामंडप आहे. या मंदिराच्या शिल्पात 'रावण कैलास पर्वत हलवतो' या प्रसंगाचे चित्रण करणारे सुंदर शिल्प कोरलेले आहे. वरच्या भागात सर्व शक्तिमान शिव अत्यंत शांतपणे एक पाय जमिनीवर सोडून आसनावर बसलेला दाखविला आहे. पर्वत हालत असल्याने भितीने पार्वती शंकराचा बाहू पकडून व पाय एका बाजूस मुडपून बसली आहे, तर भयभीत झालेली एक सेविका मागील अंधकारमय भागात पळत सुटली आहे असे शिल्प वरच्या भागात शिल्पांकित केले आहे.[६] मंदिराच्या आंतरगत व बाह्य भागावर अनेक शिल्पे कोरल्याचे दिसून येते. गोवर्धनधारी श्रीकृष्णावतार, शिव–पार्वती, राम–सीता, गरूढारूढ विष्णू, ध्वजस्तंभावरील सूर्यदेवता, यक्षप्रतिमा, पुराण कथा व शिवलीलावर आधारित प्रसंग, राम, रावण , लक्ष्मण, शिव–पार्वती विवाह, सप्तमातृका, रामायण–महाभारतातील प्रसंग, यक्ष व गंधर्व प्रतिमा, हरिण व बैल प्रतिमा, रावण–जटायू युध्द, नरसिंह–हिरण्य कश्यपू, अर्धनारीनटेश्वर, महिषासूरमर्दनी इत्यादी असंख्य शिल्पे साकारण्यात आलेली आहेत.[७] या शिल्पात भावना प्रकटीकरणासाठी अवकाश व छायाप्रकाश यांचा खुबीदारपणे व समर्थपणे उपयोग केला आहे. नंदीमंडपाच्या उत्तरेकडील बाजूने वर चढून जाताना भिंतीवर शिल्पपट पहायला मिळतो. त्यात रावण कैलास पर्वत उचलत असण्याचा प्रसंग कोरला आहे. पुढे चढून गेल्यावर ब्रह्मा, विष्णू व महेश यांच्या मूर्ती दिसतात. दक्षिणेकडील भिंतीवर नरसिंह व हिरण्यकश्यपू यांच्यातील युध्दप्रसंग कोरलेला आहे.[८] सभामंडपातील स्तंभावर नरसिंह अवतार, समुद्रमंथन असे पौराणिक प्रसंग कोरलेले आहेत. छताच्या मध्यभागी नटराज शिवाची मूर्ती लक्ष वेधून घेते. अंतराळात शिवपार्वती सोंगट्या खेळत असल्याचे तसेच सोबत शिवगण कोरले आहेत. गर्भगृहात भव्य आकाराचे शिवलिंग असून त्याच्या छतावर कमळ कोरलेले आहे. कैलास मंदिरावरील मुख्य शिखरावर शिल्पकारानी शिल्पाच्या माध्यमातून नृत्यसभा उभी केली असून या शिल्पात वादक, नर्तक कोरल्याचे दिसते.

लहान–लहान आकाराची आणि विविध विषयावर आधारलेली अगणित शिल्पे या ठिकांणी कोरलेली आहेत. कधी कुठले शिल्प नजरेत भरेल हे कळतच नाही. संपूर्ण मंदिराच्या बाह्य भिंतीवर जे अनेक पट्टे कोरलेले आहेत, त्यामधील नक्षीकाम केवळ अजोड असेच आहे. अखंड पाषणातून ही सर्व शिल्पे घडविताना, कोरताना, कलाकारांनी साधलेली किमया केवळ अजोड अशी आहे. कैलास मंदिराची रचना अतिशय सुनियोजीत, प्रमाणबध्द, रेखीव, काळजीपूर्वक व शांतचित्ताने केलेली दिसून येते. वेरूळचे मंदिर पाहात असताना पट्टदक्कल(कर्नाटकातील बागलकोट जिल्हयात)येथील विरूपाक्ष मंदिराची आणि कांचीपुरम (तामिळनाडू) येथील कैलासनाथाच्या मंदिराची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. कारण या तिन्ही मंदिराच्या शैलीत विलक्षण साम्य असल्याचे दिसून येते. येथील मंदिर स्थापत्यांवरून तत्कालीन सांस्कृतिक जीवनावरही प्रकाश टाकता येतो.

समारोप–

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

कलाविष्कार हे प्राचीन भारतीय संस्कृतीचे वैभवशाली अंग असून स्थापत्य शिल्प, चित्र, संगीत व नृत्यनाट्य या पाच प्रकारच्या माध्यमांतून ही कलाभिव्यक्ती झालेली आहे. त्यातही स्थापत्य कला नानाविध रूपात प्रकट झाल्याचे दिसते. भारतीय स्थापत्य कलेचा विकास मौर्यकाळापासून सुरू होऊन पुढील कालखंडात वाढतच गेला. चालुक्य आणि राष्ट्रकूटांच्या कालखंडात अजस्त्र डोंगर खोदून मोठमोठाली मंदिरे निर्माण करण्यात आली. आठव्या शतकात राष्ट्रकूट राजा कृष्ण पहिला याच्या कारकीर्दित मराठवाडयातील वेरूळ याठिकांणी आधी कळस मग पाया या पध्दतीने कैलास मंदिर निर्माण करण्यात आले. मंदिर निर्मितीची प्रकिया कळसाकडून सुरूवात होऊन पायाला समाप्त झाली. संपूर्ण मंदिर डोंगर कोरून एका पाषाणात कोरण्यात आलेले आहे. कैलास मंदिराचे वैभव व त्यातील कोरिव काम संपूर्ण हिंदू धर्माची साक्ष देतात. मंदिराच्या प्रवेशद्वारावर तसेच मंदिरातील स्तंभ व छतावर विविध प्रकारची हिंदू देवदेवतांची मूर्तिशिल्प कोरली आहेत. या मंदिरामधले स्तंभही वैशिष्ट्यपूर्ण असून छत पेलण्याबरोबरच नक्षीकाम, कोरीवकाम करण्यास कलाकारांना उत्तम वाव या स्तंभनी दिला आहे. एका अखंड पाषाणातून हे मंदिर खोदकाम करण्यामध्ये कलाकारांनी जी कसोशी साधलेली आहे ती केवळ अजोड आहे. थोडक्यात सध्याच्या मराठवाडयातील वेरूळचे कैलास मंदिर म्हणजे शिल्पकलेतील पूर्ण विराम आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

संदर्भ:

१. राधिका टिपरे—वेरूळ लेण्यामधील शिल्पवैभव, मेहता पब्लिशंग हाऊस, पुणे प्रथमावृत्ती— जानेवारी २००६, पृ.क्र.१८
२. डॉ. अनिल सिंगारे, डॉ.ओमशिवा लिगाडे— दक्षिण भारताचा इतिहास, अरूणा प्रकाशन लातूर, प्रथम आवृत्ती— ९ ऑगस्ट २०१३, पृ.क. १०१
३. आळतेकर ए.एस.—राष्ट्रकूटस अॅड देअर टाईम्स, ओरिएंटल बुक एजन्सी, पुना, सन—१९६७ पृ.क.२२ ते२३
४. डॉ. गो.बं. देगलूरकर — प्राचीन भारत, अपरांत प्रकाशन पुणे, सप्टेंबर—२०१५, पृ.क.२८१
५. प्रा.श्री.ह.शहाणे — भारतीय कलेचा इतिहास, गंगल प्रकाशन, मुंबई, पृ.क.१३९
६. कित्ता— पृ.क. १४०
७. पुर्वोक्त—राधिका टिपरे, पृ.क. १०८ ते १४८
८. डॉ.जी.एस.महाडीक— प्राचीन महाराष्ट्रातील कला, आधार पब्लिकेशन, अमरावती प्रथमावृत्ती—१ एप्रिल २०१२ पृ.क. १७४

S.P. Mahavidyalaya, Bhoom
BHOOM
Tq.Bhoom Dist O.bad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya, Bhoom
Dist.Osmanabad